NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७१ / ७२/ ७३ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in ई-मेल: bcudjanvikas@sus.ac.in

**कौशल्य विकास केंद्र**

**संदर्भ क्र. पुअहोसोविसो/कौशल्य विकास केंद्र/२०१९/** 4487 **दिनांक**- 6 JUN 2019

**प्रति,**
**सर्व संलग्नित महाविद्यालय/संस्था**
**कौशल्य विकास केंद्र**
**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**

**विषय :-** विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत.

**महोदय,**

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठातील कौशल्य विकास केंद्रा अंतर्गत विविध अभ्यासक्रम चालविले जातात. काही विद्यार्थी एकाच अभ्यासक्रमासाठी दोन महाविद्यालय/संस्थेमध्ये प्रवेश घेतल्याचे आढळून आले आहे. याप्रमाणे दोन्ही ठिकाणी प्रवेश घेतल्यामुळे विनाकारण प्रशासकीय व परीक्षेसंदर्भात प्रश्न निर्माण होतात. व त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सबब, या पत्राव्दारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, शै. वर्ष २०१९-२० पासून कौशल्य विकास केंद्रा अंतर्गत विविध अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांना प्रवेश देते वेळी विद्यार्थ्याने इतर ठिकाणी त्याच अभ्यासक्रमास प्रवेश घेतला आहे काय याची चौकशी करूनच प्रवेश द्यावा, तसेच विद्यार्थ्यांकडून इतर ठिकाणी त्याच अभ्यासक्रमास प्रवेश घेतला नाही याबाबतचे लेखी हमीपत्र लिहून घ्यावे. याउपरही विद्यार्थ्याने कौशल्य विकास केंद्र अंतर्गत एकाच वेळी दोन ठिकाणी सारख्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला तर संबंधीत विद्यार्थ्याचा दोन्हीकडील प्रवेश रद्द केला जाईल याची नोंद घ्यावी. व या शैक्षणीक नुकसाणीची जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील. तशी चुक निर्दशनास आल्यास संबंधीत संस्था दंडास पात्र राहील.

कौशल्य विकास अभ्यासकेंद्रांशी निगडित अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांने प्रवेशित झाल्यानंतर प्रवेशित विद्यार्थ्यांस प्रवेश रद्द करता येणार नाही. अपरिहार्य परिस्थितीमध्ये जर प्रवेश रद्द केला तर शुल्काबाबत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा निर्णय अंतीम राहिल.

सदरील बाब सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून द्यावी.

कळावे,

**आपला,**

[ म.स.रोकडे ]
**उपकुलसचिव**
**शैक्षणिक, संशोधन आणि विकास**

Scanned by CamScanner